सामाजिक न्याय व आदिवासी विकास विभागामार्फत देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती प्रकरणांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याकरिता विशेष चौकशी पथक (टास्क फोर्स) ची स्थापना करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-०८१५/प्र.क्र.५२८/पोल-१३
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १५ जानेवारी, २०१६

प्रस्तावना

सामाजिक न्याय व आदिवासी विकास विभागामार्फत देण्यात येत असलेल्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती वाटपात गडचिरोली जिल्ह्यात गैरव्यवहार झाल्याच्या बातम्या प्रसिध्द झाल्या आहेत.

सदर गैरव्यवहार हा प्रकल्प अधिकारी कार्यालय, गडचिरोली यांच्या कार्यक्षेत्रातील शैक्षणिक संस्थांमध्ये उघडकीस आला असला तरी, अशा प्रकारची अनियमितता राज्यात इतर ठिकाणी होत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्क योजनांची अंमलबजावणी नियमानुसार झाली आहे किंवा कसे याबाबत विशेष चौकशी पथक (टास्कफोर्स) नियुक्ती करुन चौकशी करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय

या शासन निर्णयाद्वारे केंद्र शासनाची मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती वाटपात राज्यामध्ये गैरव्यवहार झाले किंवा कसे याबाबत एक विशेष चौकशी पथक (टास्कफोर्स) ची स्थापना करण्यात येत आहे.

(अ) विशेष चौकशी पथक (टास्कफोर्स) ची संरचना :

१)	श्री.के.व्यंकटेशम, अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण), मुंबई	अध्यक्ष
२)	श्री.पियुष सिंग, आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.	सदस्य
३)	श्री.रणजीतसिंह देओल,व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,मुंबई	सदस्य

(ब) विचारार्थ विषय:

(१) सदर विशेष चौकशी पथक ०१ जानेवारी, २०१० पासून सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग व वैद्यकीय शिक्षण विभाग यांचेमार्फत राज्यातील विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या केंद्र शासनाच्या मॅट्रीकोत्तर विविध शिष्यवृत्ती तसेच शैक्षणिक शुल्क वाटपात गैरव्यवहार झाला किंवा कसे याबाबत चौकशी करुन अहवाल मा.मुख्य सचिव यांना सादर करेल.

(२) चौकशीत सकृतदर्शनी आढळून आलेल्या दोषी व्यक्तींची नावे, पदनाम व कालावधी याबाबतची माहिती अहवालात नमूद करतील.

(३) अशाप्रकारचे गैरव्यवहार भविष्यात घडणार नाहीत याबाबत उपाययोजना सुचवतील.

(४) चौकशी पथकास आवश्यक वाटेल त्या शैक्षणिक संस्थांतील अधिकारी/कर्मचारी/संस्थाचालक तसेच आदिवासी विकास विभागातील व सामाजिक न्याय विभागातील क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी/कर्मचारी व इतर संबंधितांना चौकशीसाठी बोलावू शकतील. चौकशीसाठी बोलविण्यात येणाऱ्या व्यक्तींनी चौकशी पथकाला माहिती/दस्तावेज उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

(५) चौकशी पथक आवश्यकतेनुसार दौरे करेल, सदर दौऱ्याची व्यवस्था यामध्ये निवास, वाहन व चौकशीसाठी/सुनावणीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

(६) उक्त विशेष चौकशी पथकासाठी आवश्यक ते अधिकारी व कर्मचारी हे पथकातील पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या आस्थापनेतून उपलब्ध करुन घ्यावेत.

(७) सदर चौकशी पथकाने त्यांचा अहवाल मा. मुख्य सचिव यांना ६० दिवसांच्या आत सादर करावा. तसेच विशेष चौकशी पथकातील सदस्य/अधिकारी/कर्मचारी यांनी केलेला प्रवास खर्च हा त्यांच्या आस्थापना सांभाळणाऱ्या यंत्रणेने करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११५१७५४०३७८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vitthal Dattaram Phansekar

Digitally signed by Vitthal Dattaram Phansekar
DN: CN = Vitthal Dattaram Phansekar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Desk Officer
Date: 2016.01.15 18:27:44 +05'30'

(विठ्ठल फणसेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव
४) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, सामाजिक न्याय, आदिवासी विकास, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, शालेय शिक्षण व क्रीडा, कृषी व पदुम, महसूल व वन.
५) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) सर्व पोलीस महानिरीक्षक
७) संचालक, जनसंपर्क व माहिती संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१०) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

११) आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.

१२) श्री.के.व्यंकटेशम, अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण), पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई.

१३) श्री.पियुष सिंग, आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१४) श्री. रणजीतसिंह देओल,व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई.

१५) सर्व पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त

१६) सर्व जिल्हाधिकारी

१७) निवडनस्ती पोल-१३.